**L. A. BILL No. LV OF 2026.**

A BILL
FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA
MONEY-LENDING (REGULATION) ACT, 2014.

**सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५५.**

**महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम, २०१४ यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.**

२०१४ चा महा. ८.

**ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम, २०१४ यात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या सत्त्याहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

**१.** या अधिनियमास, महाराष्ट्र सावकारी (नियमन) (सुधारणा)अधिनियम, २०२६, असे म्हणावे. संक्षिप्त नाव.

(शा.म.मु.) एचबी ८३८—१ (१,०४०–७-२०२६)

सन २०१४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८ याच्या कलम ३९ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम, २०१४ (यात यापुढे ज्याचा निर्देश, "मुख्य अधिनियम" असा केला आहे) याच्या कलम ३९ मध्ये,— २०१४ चा महा. ८.

(१) "पाच वर्षांपर्यंत" या मजकुराऐवजी, "सात वर्षांपर्यंत" हा मजकूर दाखल करण्यात येईल;

(२) "पन्नास हजार रुपयांपर्यंत" या मजकुराऐवजी, "एक लाख रुपयांपर्यंत" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन २०१४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८ याच्या कलम ४१ ची सुधारणा.

**३.** मुख्य अधिनियमाच्या कलम ४१ मध्ये, खंड (ग) मधील,—

(१) उप-खंड (एक) मधील,-

(क) "एक वर्षापर्यंत" या मजकुराऐवजी, "तीन वर्षांपर्यंत" हा मजकूर दाखल करण्यात येईल;

(ख) "पंधरा हजार रुपयांपर्यंत" या मजकुराऐवजी, "पन्नास हजार रुपयांपर्यंत" हा मजकूर दाखल करण्यात येईल;

(२) उप-खंड (दोन) मधील,—

(क) "पाच वर्षांपेक्षा" या मजकुराऐवजी, "सात वर्षांपेक्षा" हा मजकूर दाखल करण्यात येईल;

(ख) "पन्नास हजार रुपयांपेक्षा" या मजकुराऐवजी, "एक लाख रुपयांपेक्षा" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन २०१४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८ याच्या कलम ४५ ची सुधारणा.

**४.** मुख्य अधिनियमाच्या कलम ४५ मधील,—

(१) "दोन वर्षांपर्यंत" या मजकुराऐवजी, "तीन वर्षांपर्यंत" हा मजकूर दाखल करण्यात येईल;

(२) "पाच हजार रुपयांपर्यंत" या मजकुराऐवजी, "एक लाख रुपयांपर्यंत" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

## उद्देश व कारणे यांचे निवेदन

महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम, २०१४ (२०१४ चा महा. ८) हा, सावकारांकडून होणाऱ्या कर्जदार शेतकऱ्यांच्या पिळवणुकीस प्रभावी रीतीने प्रतिबंध करण्यासाठी समुचित व कठोर सामाजिक आणि कायदेशीर उपाययोजना करण्यासाठी आणि महाराष्ट्र राज्यातील सावकारीच्या व्यवहारांचे नियमन व नियंत्रण करण्यासाठी अधिनियमित केला आहे.

**२.** उक्त अधिनियमाची कलमे ३९, ४१ व ४५ यांमध्ये, जी व्यक्ती, वैध अनुज्ञप्तीशिवाय सावकारी व्यवसाय करते, बनावट नावाने अनुज्ञप्ती मिळविते, अनुज्ञप्तीमध्ये नमूद केलेले नसेल अशा जागी सावकारी करते आणि कर्जदाराकडून सावकाराला देय असलेल्या कर्जाची वसुली करण्यासाठी कर्जदाराला उपद्रव देते किंवा उपद्रव देण्यास अपप्रेरणा देते, त्या व्यक्तीस शिक्षा करण्याची तरतूद केलेली आहे.

तथापि, उक्त अधिनियमान्वये दंडात्मक तरतुदी केलेल्या असताना देखील, काही व्यक्ती व संस्था अवैध सावकारी कृत्ये वारंवार करीत आहेत. अशा वारंवार उल्लंघनामुळे कर्जदाराच्या हितसंबंधावर प्रतिकूल परिणाम होतो, नियामक चौकट कमकुवत होते आणि कायद्याची जरब कमी होते.

**३.** म्हणून, अवैध सावकारी कृत्यांना पायबंद घालण्यासाठी, कर्जदारांचे पिळवणुकीपासून संरक्षण करण्यासाठी आणि वारंवार अपराध करणाऱ्या गुन्हेगारांचे उत्तरदायित्व सुनिश्चित करण्यासाठी आणि उक्त अधिनियमाची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी, उक्त अधिनियमाची कलमे ३९, ४१ व ४५ यांमध्ये सुयोग्य सुधारणा करून, शिक्षा वाढविणे इष्ट आहे, असे शासनास वाटते.

**४.** वरील उद्दिष्टे साध्य करणे हा, या विधेयकाचा हेतू आहे.

मुंबई,
दिनांक ६ जुलै, २०२६.

**बाबासाहेब पाटील,**
सहकार मंत्री.

**सन २०२६ चे वि.स.वि. क्र. ५५.— महाराष्ट्र सावकारी (नियमन) (सुधारणा) विधेयक, २०२६ याचे परिशिष्ट.**

**(महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम, २०१४ यातील उतारे)**

**(सन २०१४ चा महाराष्ट्र क्रमांक ८)**

**१. ते ३८.** *** *** ***

**३९.** जी कोणी व्यक्ती वैध अनुज्ञप्तीशिवाय सावकारीचा व्यवसाय करील त्या व्यक्तीला दोष सिद्ध झाल्यानंतर पाच वर्षांपर्यंत असू शकेल एवढ्या कोणत्याही प्रकारच्या कारावासाची किंवा पन्नास हजार रुपयांपर्यंत असू शकेल एवढ्या द्रव्यदंडाची किंवा या दोन्ही शिक्षा करण्यात येतील. वैध अनुज्ञप्तीशिवाय सावकारी करण्याबद्दल शास्ती.

**४०.** *** *** ***

**४१.** जी कोणी व्यक्ती,— खोट्या नावाने अनुज्ञप्ती मिळविणे, अनुज्ञप्तीमध्ये नमदू न केलेल्या जागी सावकारी करणे, इत्यादी.

(क) व (ख) *** *** ***

(ग) वैध अनुज्ञप्तीशिवाय किंवा जे तिचे खरे नाव नाही अशा नावाने मिळवलेल्या अनुज्ञप्तीवर, सावकारीचा व्यवसाय करताना कोणताही करार करील,—

त्या व्यक्तीला, दोष सिद्ध झाल्यानंतर,—

(एक) पहिल्या अपराधासाठी, एक वर्षापर्यंत असू शकेल एवढ्या कोणत्याही प्रकारच्या कारावासाची किंवा पंधरा हजार रुपयांपर्यंत असू शकेल एवढ्या द्रव्यदंडाची किंवा या दोन्ही शिक्षा करण्यात येतील, आणि

( दोन ) दुसऱ्या किंवा त्यानंतरच्या अपराधासाठी, खंड (एक) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या शास्तीव्यतिरिक्त, किंवा त्या शास्तीऐवजी, ती व्यक्ती कंपनी नसेल तेव्हा पाच वर्षांपेक्षा कमी नसेल एवढ्या कोणत्याही प्रकारच्या कारावासाची, आणि ती व्यक्ती कंपनी असेल तेव्हा, पन्नास हजार रुपयांपेक्षा कमी नसेल एवढ्या द्रव्यदंडाची शिक्षा करण्यात येईल.

**४२. ते ४४.** *** *** ***

**४५.** जी कोणी व्यक्ती, कर्जदाराकडून सावकाराला देय असलेल्या कर्जाची वसुली करण्यासाठी कर्जदाराला उपद्रव देईल अथवा उपद्रव देण्यास अपप्रेरणा देईल त्या व्यक्तीस, दोष सिद्ध झाल्यानंतर, दोन वर्षांपर्यंत असू शकेल एवढ्या कोणत्याही प्रकारच्या कारावासाची किंवा पाच हजार रुपयांपर्यंत असू शकेल एवढ्या द्रव्यदंडाची किंवा या दोन्ही शिक्षा करण्यात येतील. उपद्रव दिल्याबद्दल शास्ती.

"परंतु, जी व्यक्ती, कर्जदाराच्या घरी अथवा ठिकाणी, केवळ माहिती मिळविण्यासाठी किंवा ती देण्यासाठी जाईल त्यास या कलमाच्या प्रयोजनार्थ उपद्रव असे मानण्यात येणार नाही.".

**स्पष्टीकरण.**— या कलमाच्या प्रयोजनांसाठी, जी व्यक्ती, अन्य एखाद्या व्यक्तीने, जे कृत्य करण्याचा तिला हक्क आहे असे कोणतेही कृत्य करू नये किंवा जे कृत्य न करण्याचा तिला हक्क आहे असे कोणतेही कृत्य करावे या उद्देशाने,—

(क) अशा अन्य व्यक्तीस अडथळा करील किंवा तिच्यावर बळाचा वापर करील किंवा तिला धाकदपटशा दाखविल, अथवा

(ख) अशा अन्य व्यक्तीचा जागोजागी पाठलाग करील, किंवा तिच्या मालकीच्या अथवा ती वापरत असलेल्या कोणत्याही मालमत्तेमध्ये ढवळाढवळ करील, किंवा तिला त्या मालमत्तेचा वापर करू देणार नाही किंवा तिचा वापर करण्यात अडथळा निर्माण करील, अथवा

(ग) ज्या घरात किंवा इतर ठिकाणी अशी अन्य व्यक्ती राहत असेल किंवा काम करीत असेल किवा व्यवसाय करीत असेल किंवा तेथे राहत असेल अशा कोणत्याही घराच्या किंवा इतर जागेच्या जवळपास भटकत राहील. अथवा तिला त्रास होईल किंवा धाकदपटशा वाटेल असे कोणतेही कृत्य करील,—

ती व्यक्ती अशा व्यक्तीस उपद्रव देते असे समजण्यात येईल.

**४६.** ते **५५.** *** *** ***

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[ सन २०२६ चे विधानसभा विधेयक  क्रमांक ५५.]**

**[महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम, २०१४ यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.]**

**[श्री. बाबासाहेब पाटील,**
सहकार मंत्री.]

**जितेंद्र भोळे,**
सचिव -१,
महाराष्ट्र विधानसभा.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.